जिल्हा क्रीडा संकुलाचे परिरक्षण (लेखाशीर्ष २२०४ ५३१२) - विभागीय / जिल्हा / तालुका क्रीडा संकुल निधी वितरणास प्रशासकीय मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः क्रीडायो-२३१८/प्र.क्र.१७५/क्रीयुसे-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ मार्च, २०१९.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/(प्र.क्र.११/०३)/क्रीयुसे-१, दिनांक २६ मार्च,२००३.
२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००९/(प्र.क्र.२५/०९)/क्रीयुसे-१, दिनांक २१ मार्च,२००९.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.क्रीडायो-२३१८/प्र.क्र.१७५/क्रीयुसे-१, दिनांक १६ जानेवारी, २०१९.
४. सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक-ताक्रीसं/देदु/निमा/निवि/२०१८-१९/का-९/६३९४, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना :-

सध्याच्या क्रीडा संकुलाच्या योजनेनुसार विभागीय/जिल्हा/तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी अनुक्रमे २४००.०० लाख, ८००.०० लाख, १००.०० लाख याप्रमाणे अनुदान देण्यात येते. यानंतर या संकुलाच्या देखभालीसाठी द्यावयाच्या निधीची तरतूद, शासन निर्णय दिनांक २६ मार्च, २००३ मधील परिच्छेद-२ व ६ मध्ये खालील प्रमाणे आहे :-

अ.क्र.	संकुल	प्रथम वर्षाकरिता	द्वितीय वर्षाकरिता	तृतीय वर्षाकरिता
१	विभागीय क्रीडा संकुल	१५.०० लाख	१२.५० लाख	१०.०० लाख
२	जिल्हा क्रीडा संकुल	१०.०० लाख	७.५० लाख	५.०० लाख
३	तालुका क्रीडा संकुल	प्रतिवर्षी ३.०० लाख		

२. या योजने अंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.४००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार क्रीडा व युवक संचालनालयाच्या संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये संबंधित तालुका क्रीडा संकुलांसाठी रु.४०.८२६ लक्ष (८०% मर्यादेत) इतकी तरतूद वितरीत करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्याप्रमाणे तालुका क्रीडा संकुलांसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेली तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

जिल्हा क्रीडा संकुलाचे परिरक्षण या कार्यक्रमांतर्गत योजनेकरीता सन २०१८-१९ या वर्षाकरिता विभागीय क्रीडा संकुल, जिल्हा क्रीडा संकुल तसेच तालुका क्रीडा संकुल यांच्या देखभालीसाठी अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी तालुका क्रीडा संकुलांना देय असलेली रु.४०.८२६ लक्ष (रुपये चाळीस लाख ब्याऐंशी हजार सहाशे फक्त) इतकी तरतूद सोबतच्या परिशिष्ट-“अ” मध्ये दर्शविल्यानुसार वितरीत करण्यास व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. याप्रमाणे संकुलांच्या देखभाल दुरुस्तीसाठी अनुदान वितरीत करताना खालील अटी व शर्ती लागू राहतील:-

(अ) प्रति वर्ष संकुल देखभालीसाठी प्रस्तावित केलेले अनुदान क्रीडा संकुलास प्राप्त होणारे उत्पन्न यातून येणारी तूट यापैकी किती रक्कम कमी असेल अशी रक्कम अनुदान म्हणून मंजूर करण्यात यावी.

(ब) संकुलाचा विमा उतरविताना प्रामुख्याने केंद्र शासनाचा उपक्रम असणा-या विमा कंपनीकडून संकुलांना विमा संरक्षण घ्यावे,

(क) या योजनेसाठी प्रत्येक आर्थिक वर्षात मिळणा-या अनुदानाचे वितरण शासन मान्यतेने करण्यात यावे.

३. सन २०१८-१९ मध्ये देखभाल दुरुस्तीकरीता उपलब्ध झालेल्या रु.४००.०० लक्ष एवढया तरतुदी मधून सोबतच्या परिशिष्ट-“अ” मध्ये नमूद तालुका क्रीडा संकुलाच्या देखभाल व दुरुस्ती करीता सदर निधी वितरीत करण्यात यावा.

I. उपरोक्त देखभाल दुरुस्तीचा निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आहरीत करावी. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन उपरोक्त वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च मागणी क्रमांक ई-३, प्रधान लेखाशीर्ष २२०४, क्रीडा व युवक सेवा, १०४, क्रीडा व खेळ, (१६) (०३) जिल्हा क्रीडा संकुलांचे परिरक्षण (२२०४ ५३१२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील या वर्षाच्या उपलब्ध तरतूदीतून करण्यात यावा.

५. वित्त विभाग दिनांक ०२.०४.२०१८ व २५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी तालुका क्रीडा संकुल समितीला प्रशासकीय खर्चासाठी प्रत्येक जिल्हयापुढे दर्शविलेल्या मंजूर रक्कमेकरिता संबंधीत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना

आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र.१, २, ३, ४, ५, ६ व ७ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८११०४१३५१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.08 11:05:30 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
९. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषाधिकारी (संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)
१२. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (क्रीयुसे-१).

परिशिष्ट-“अ”

तालुका क्रीडा संकुल देखभाल अनुदान सन २०१८-१९

अ.क्र.	जिल्हा	अ.क्र.	तालुका	तालुकानिहाय देय अनुदान	जिल्हानिहाय देय अनुदान
१	२	३	४	५	६
१	अहमदनगर	१	पारनेर	१,५९,४००/-	१,५९,४००/-
२	सातारा	२	फलटण	३,००,०००/-	६,००,०००/-
		३	खटाव-वडूज	३,००,०००/-	
३	औरंगाबाद	४	पैठण	३,००,०००/-	१५,००,०००/-
		५	कन्नड	३,००,०००/-	
		६	सोयगांव	३,००,०००/-	
		७	गंगापूर	३,००,०००/-	
		८	औरंगाबाद	३,००,०००/-	
४	बीड	९	धारुर	२,१५,४००/-	२,१५,४००/-
५	परभणी	१०	जिंतुर	२,०१,०००/-	२,०१,०००/-
६	उस्मानाबाद	११	तुळजापूर	३,००,०००/-	११,८३,४००/-
		१२	उमरगा	३,००,०००/-	
		१३	कळंब	३,००,०००/-	
		१४	भुम	२,८३,४००/-	
७	लातूर	१५	उदगीर	२,२३,४००/-	२,२३,४००/-
एकूण				**४०,८२,६००/-**	**४०,८२,६००/-**
(अक्षरी रुपये चाळीस लाख ब्याऐंशी हजार सहाशे फक्त)					

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.08 11:06:24 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन